# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
# ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
## कार्यपत्रिका क्र. ६
## सभावृत्तांत

दिनांक :- ४/०९/२०१८ वेळ :- दुपारी १२.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक ०४/०९/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.करुणा शेखर चिंचवडे - अध्यक्ष
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ
३. मा.प्रज्ञा महेश खानोलकर
४. मा.संगिता राजेंद्र भोंडवे
५. मा.नामदेव जनार्दन ढाके
६. मा.सुरेश शिवाजी भोईर
७. मा.अपर्णा निलेश डोके
८. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
९. मा.राजेंद्र तानाजी गावडे
१०. मा.निता विलास पाडाळे
११. मा.उषा दिलीप काळे
१२. मा.संतोष अंकुश कोकणे
१३. मा.बिभीषण चौधरी, नामनिर्देशीत सदस्य
१४. मा.देवीदास पाटील , नामनिर्देशीत सदस्य
१५. मा.विठ्ठल भोईर , नामनिर्देशीत सदस्य

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.संदिप खोत – क्षेत्रीय अधिकारी, मा.प्रशांत पाटील, कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग, मा.एकनाथ पाटील, कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग, मा.अकबर शेख, उपअभियंता, विदयुत विभाग, मा.सी.एन.धानोरकर उपअभियंता स्थापत्य विभाग, मा.एच.पी.बन्सल, उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.राजेंद्र इंगळे, उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.राजेंद्र जावळे, उपअभियंता, जलनिसारण विभाग, मा. के.डी.दरवडे, सहा.आरोग्याधिकारी ब क्षेत्रीय कार्यालय, , श्री.किशोर ढगे, अतिक्रमण निरीक्षक , अतिक्रमण विभाग इत्यादी.

सर्वप्रथम मा.करुणा शेखर चिंचवडे अध्यक्षा यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

तदनंतर मा.निता विलास पाडाळे यांनी पुढीलप्रमाणे सुचना मांडली.

भारताचे माजी पंत प्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे दुखद निधन झाल्याने त्यांना श्रध्दाजली वाहून मा.प्रभाग समिती सभा तहकुब करणेत यावी व सदरची तहकुब सभा दिनांक ३/१०/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता घेणेत यावी.

सदर सुचनेस मा.अश्विनी गजानन चिंचवडे पाटील यांनी अनुमोदन दिले.

त्या नंतर मा.प्रभाग समिती सभागृहात माजी पंतप्रधान अटलबिलारी वाजपेयी यांना दोन मिनिटे उभे राहून श्रध्दाजली वाहणेत आली.

तदनंतर मा.अध्यक्ष करुणा शेखर चिंचवडे यांनी आज दिनांक ४/९/२०१८ रोजीची मा.प्रभाग समिती सभा पुढील महिन्याच्या दिनांक ३/१०/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत तहकुब करणेत येत असल्याचे प्रकट केले.

[करुणा शेखर चिंचवडे]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/१८०/२०१८.
दिनांक : १ / ११ /२०१८

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**(दिनांक ४/९/२०१८ रोजीची तहकुब सभा )**

**कार्यपत्रिका क्र. ६**
**सभावृत्तांत**

दिनांक :- ०३/१०/२०१८ वेळ :- दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक तहकुब सभा बुधवार दिनांक ०३/१०/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.करुणा शेखर चिंचवडे - अध्यक्ष
२. मा.संगिता राजेंद्र भोंडवे
३. मा.नामदेव जनार्दन ढाके
४. मा.सुरेश शिवाजी भोईर
५. मा.अपर्णाताई निलेश डोके
६. मा.राजेंद्र तानाजी गावडे
७. मा.निता विलास पाडाळे
८. मा.बिभीषण चौधरी, नामनिर्देशीत सदस्य
९. मा.विठठल भोईर , नामनिर्देशीत सदस्य

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.संदिप खोत – क्षेत्रीय अधिकारी, मा.रामदास तांबे, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.प्रशांत पाटील, कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग, मा.एकनाथ पाटील, कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग, मा.अकबर शेख, उपअभियंता, विदयुत विभाग, मा.सी.एन.धानोरकर, उपअभियंता स्थापत्य विभाग, मा.एच.पी.बन्सल, उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.राजेंद्र इंगळे, उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.भाऊसाहेब साबळे, उपअभियंत पाणीपुरवठा विभाग, मा.राजेंद्र जावळे, उपअभियंता, जलनिसारण विभाग, मा.के.बी.पारोल, मुख्य आरोग्य निरिक्ष ब क्षेत्रीय कार्यालय, , श्री.किशोर ढगे, अतिक्रमण निरिक्षक, अतिक्रमण मुख्य कार्यालय, इत्यादी.

सर्वप्रथम मा.करुणा शेखर चिंचवडे अध्यक्षा यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

तदनंतर मागील कार्यपत्रिका क्रमांक ५, दिनांक ७/८/२०१८ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आला.

ठराव क्र. २२ विषय क्र. १

दिनांक ०३/१०/२०१८ विभाग - नगररचना विभाग

सुचक : मा.सुरेश भोईर अनुमोदक: मा. राजेंद्र गावडे

संदर्भ :- मा.मोरेश्वर भोंडवे यांचा दिनांक ७/८/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

मौजे-रावेत येथील शिंदे वस्ती येथील एम आय डी सी पार्पलाईन रस्ता स.नं.१८६ पासून पुर्वेकडे जाणारा डीपी रस्ता दक्षिणोत्तर १८.०० मी.रस्त्यास स.नं.१९१ मी पर्यंतचा रस्ता १८ मी रुंदीचा घोषीत केल्यास सदर ठिकाणी नागरी भाग असल्याने सदर रस्ता घोषीत केल्यास मिळकतधारकास मोबदला देता येणे मनपास शक्य होणार आहे. सबब मौजे-रावेत येथील शिंदे वस्ती येथील एम आय डी सी पार्पलाईन रस्ता स.नं.१८६ पासून पुर्वेकडे जाणारा डीपी रस्ता दक्षिणोत्तर १८ मी रस्त्यास स.नं.१९१ मी पर्यंतचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये १८ मी रुंदीचा रस्ता घोषीत करणेकामीच्या प्रस्तावास व सदर रस्ता घोषीत करणेकामी विहीत कार्यवाही पुर्ण करण्यास मा.महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेकामीचा प्रस्ताव मा.प्रभाग समितीपुढे आला असता सदर प्रस्तावासंदर्भात माहिती उपलब्ध न झाल्याने सदर विषयावर पुढील सभेत विचार करण्यात यावा.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. २३ विषय क्र. २

दिनांक ०३/१०/२०१८ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.सुरेश भोईर अनुमोदक: मा.नामदेव ढाके

संदर्भ :- मा.शिवाजी भोईर यांचा दिनांक दिनांक ३०/८/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

स.नं.२६८ लक्ष्मीनगर पिंपरी लिंकरोड येथील जागा हि गावडे परिवाराची होती सदर जागेत महानगरपालिकेचे उदयानाचे आरक्षण असून महापालिकेने जागा ताब्यात घेतली आहे सदर जागेस उदयानासाठी आरक्षित असून नवीन करण्यात येणा-या उदयानाला कै.मुरलीधर पंडितराव गावडे असे नामकरण करण्यास मान्यता देणेबाबतचा विषय मा.प्रभाग समितीपुढे आला असता, त्यावर मा.सदस्यांनी असे सांगितले की, गार्डन पुर्ण झालेले नाही. तरी सदरचा विषय तहकुब ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा.करुणा शेखर चिंचवडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[करुणा शेखर चिंचवडे]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/काविं/१८१/२०१८.
दिनांक : १ / ११ /२०१८

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना